साप्ताहिक
# लोकहिरा न्यूज
''लोक स्वातंत्र्य हेच लोकहिराचे मूळ''
■ संपादक : श्री. गणपती लक्ष्मण शिंदे (मो. ७२७६७५६५७७)
■ Email : saptahiklokhiranews51410@gmail.com
Volume-5/Issue: 35/ Date: Friday 16/10/2026 Thursday22/10/2026
Pages-4 Prize-5 Rs
RNI.NO.MAHMAR/2022/85385

## मुंबई:- मानवी तस्करीचे संपूर्ण जाळे उखडून टाका! आरोपींपुरता तपास मर्यादित नको.

### साप्ताहिक लोकहिरा न्यूज वृत्तसेवा!

पोलीस महासंचालक सदानंद दाते यांचे पोलिसांना कडक निर्देश; नेटवर्क केंद्रित तपासावर भर .

मानवी तस्करीसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये केवळ एका आरोपीला अटक करून तपास थांबवू नका, तर या गुन्ह्यांमागील संपूर्ण जाळे उघड करून गुन्हेगारीच्या मुळावर घाव घाला, असे स्पष्ट निर्देश महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी दिले. मानवी तस्करी रोखण्यासाठी गुन्हेगारांचे परस्पर संबंध, आर्थिक व्यवहार आणि गुन्ह्यांमागील संपूर्ण नेटवर्क शोधणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

मानवी तस्करीच्या गुन्ह्यांबाबत महाराष्ट्र पोलीस दल आणि प्रकृती संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पोलीस महासंचालक कार्यालयातील दरबार सभागृहात 'न्यायसेतू २०२६' राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दाते बोलत होते.

तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात गुन्ह्यांचे स्वरूपही बदलत आहे. त्यामुळे पोलिसांनी आधुनिक तंत्रज्ञानाबाबत सजग राहून गुन्हे रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. गुन्हा घडल्यास तातडीने उकल करून गुणवत्तापूर्ण तपास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

पीडितांना न्याय देणे ही पोलिसांची महत्त्वाची जबाबदारी! तपासाच्या प्रक्रियेत पीडितांची परिस्थिती समजून घेऊन त्यांना आधार आणि दिलासा मिळेल, असे संवेदनशील वर्तन ठेवण्याची गरजही दाते यांनी व्यक्त केली. पीडितांची ओळख सुरक्षित ठेवणे, साक्ष नोंदविण्याची योग्य प्रक्रिया, बंदिस्त न्यायालयीन सुनावणी तसेच वैद्यकीय मदत, दुभाषा आणि मानसिक समुपदेशन या सुविधांसाठी पोलिसांनी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधावा, असेही त्यांनी सांगितले.

अतिरिक्त पोलीस महासंचालक अस्वती दोरजे यांनी आर्थिक व्यवहार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यासह मानवी तस्करीच्या विविध पैलूंचा प्रभावी तपास करण्यासाठी कार्यशाळेची भूमिका स्पष्ट केली.



**यावेळी माजी पोलीस महासंचालक डॉ. पी. एम. नायर, महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे,विशेष पोलीस महानिरीक्षक शारदा राऊत यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मानवी तस्करीविरोधातील लढाईत केवळ अटक नव्हे, तर संपूर्ण गुन्हेगारी साखळी उद्ध्वस्त करणे हाच प्रभावी तपासाचा खरा निकष असल्याचा ठाम संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला.**

## भुदरगड तालुक्यात ११४ वनराई बंधाऱ्यांची निर्मिती

### भुदरगड लोकहिरा न्यूज वृत्तसेवा ;-



**‘सेवा संकल्प’ अभियानातून जलसंधारणाला लोकसहभागाची जोड.**

कोल्हापूर, (जिमाका) : संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाला चालना देण्यासाठी ‘सेवा संकल्प’ अभियानांतर्गत पंचायत समिती भुदरगडच्या ग्रामपंचायत विभागामार्फत १० ते १४ ऑक्टोबर या कालावधीत ‘सेवा माझे योगदान’ उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत ग्रामस्थ, बचतगटातील महिला, शालेय विद्यार्थी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सक्रिय सहभागातून १४ ऑक्टोबरपर्यंत तालुक्यात एकूण ११४ वनराई बंधाऱ्यांची निर्मिती करण्यात आली. ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ या संकल्पनेवर आधारित या मोहिमेमुळे पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा उपयोग शेतीसाठी करण्यास मदत होत आहे.वनराई बंधाऱ्यांमुळे पिकांना पाणी उपलब्ध होण्याबरोबरच विहिरी आणि परिसरातील अन्य जलस्रोतांच्या पाणीपातळीत वाढ होण्यासही हातभार लागत आहे. लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे जलसंधारण बाबत जनजागृती होण्या सोबतच पाणी टंचाईवरील उपाययोजनां नाही बळ मिळत आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी जल संधारणाच्या कामात लोकसहभाग महत्त्वाचा असून,वनराई बंधाऱ्यांच्या निर्मितीतून पाण्याचे संवर्धन आणि उपलब्ध जलस्रोतांचा अधिकाधिक उपयोग करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे गटविकास अधिकारी डॉ. शेखर जाधव यांनी सांगितले.

## लक्ष्मीनारायण मालू हायस्कूलमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर.



जयसिंगपूर येथील लोकहिरा न्यूज वृत्तसेवा:-

लक्ष्मीनारायण मालू हायस्कूलमध्ये डॉ. जे. जे. मगदूम आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल यांच्या वतीने शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२० रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात इयत्ता नववी व दहावीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी करून वैयक्तिक आरोग्य, रोगनिदान आणि स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधोपचार करण्यात आले.

या वेळी आर.एम.ओ. डॉ. सौ. सुरेखा चिपरीकर यांच्यासह दोन तज्ज्ञ डॉक्टर व नर्सिंग स्टाफ उपस्थित होते. प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. सयाजीराव पाटील व पर्यवेक्षक श्री. सतीश चिपरीकर यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांची ओळख सौ. ए. के. भिलवडे यांनी करून दिली, तर श्री. एस. व्ही. हजारे यांनी आभार मानले.

## लोकहिरा न्यूज वृत्त सेवा

### समाजसेवेचा ध्यास, कक्कया समाजाच्या उन्नतीचा ध्यास!




समाजसेवेचा ध्यास, कक्कया समाजाच्या उन्नतीचा ध्यास!

श्री. हनुमंतराव सोनवणे साहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

समाजाच्या प्रगतीसाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणारे आणि समाजहितासाठी तन-मन-धन अर्पण करणारे नेतृत्व म्हणजे श्री. हनुमंतराव सोनवणे साहेब! संत कक्कया स्वतंत्र विकास महामंडळाच्या निर्मितीसाठी सुरू झालेल्या मोहिमेत त्यांनी मोलाचे योगदान दिले. अनेकांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली, तर काहींनी विरोध दर्शविला; मात्र सोनवणे साहेबांनी समाजाच्या हिताला प्राधान्य देत सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील विविध दौऱ्यांत सक्रिय सहभाग घेतला. नोकरीच्या जबाबदाऱ्या सांभाळत भर पावसात मंत्रालयातील महत्त्वाच्या बैठकांना उपस्थित राहून त्यांनी समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी सिद्ध केली.कर्नाटकातील कक्केरी येथील जागेसंदर्भातील वैचारिक बैठकीस उपस्थित राहून बेळगाव परिसरातही त्यांनी सामाजिक कर्तव्य पार पाडले. समाजाच्या विविध प्रश्नांवर मार्गदर्शन करत संघटनात्मक कार्याला बळ देण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे.पदापेक्षा समाजहित मोठे आणि प्रसिद्धीपेक्षा समाजसेवा श्रेष्ठ, हा त्यांच्या कार्याचा संदेश आहे. अशा समर्पित नेतृत्वामुळेच समाजाची एकजूट, प्रगती आणि विकासाची वाट अधिक भक्कम होते.श्री.हनुमंतराव सोनवणे साहेबांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी आणि समाजसेवेच्या कार्यासाठी नवी ऊर्जा लाभो. शंभू महादेवांचा आशीर्वाद सदैव त्यांच्या पाठीशी राहो, हीच मनःपूर्वक प्रार्थना! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! 💐🌺

शुभेच्छुक :यशवंत ब. नारायणकर सचिव, वीरशैव कक्कया कल्याण मंडळ, मुंबई.




Scanned with OKEN Scanner

साप्ताहिक
# लोकहिरा न्यूज
विकास, विश्वास, लोकहित...

Volume-5/Issue: 35 | Date: Friday 16/10/2026 To Thursday22/10/2026 | Pages-No 3 | Prize-5 Rs | RNI.NO.MAHMAR/2022/85385

# धोरणाविषयी माहिती दिली. काही महिलांनाही आई धोरणाविषयी सविस्तर सांगितले.

## महिलांच्या सबलीकरणाचा महत्वाचा टप्पा




**■ नाशिक जिल्हातील टूर ऑपरेटर उमा देशपांडे म्हणाल्या की**

"करूया श्रमंती" नावांने आमचा टूर ऑपरेटरचा व्यवसाय आहे. या व्यवसायासाठी मला बँकेकडून कर्ज घेणे गरजेचे होते. कर्जाशी संबंधित बँकेकडे संपर्क साधता तेथील मॅनेजरनेच मला शासनाच्या 'आई' धोरणाबाबत माहिती दिली. त्यानुसार पर्यटन विभागाच्या कार्यालयांशी मी संपर्क साधला. त्यानंतर अर्ज कसा करायचा, आवश्यक कागदपत्रे याबाबत त्यांनी मला सविस्तर माहिती दिली. सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यानंतर आम्हाला 'आई' धोरणाचा लाभ मिळाला. अगदी कमी कालावधीत प्रक्रिया पूर्ण झाली. बँकेकडुन कर्ज मिळाल्यानंतर व्याजाची रक्कम 'आई' धोरणांच्या नियमांनुसार आम्हाला नियमित मिळते. शासनाकडुन आर्थिक सहाय्य लाभल्यामुळे आमचा व्यवसायही सुरळीत सुर आहे."

# 'जागृती'च्या शर्व घुगरेची राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धसाठी निवड

## १०मीटर पीप साईट एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक




**गडहिंग्लज लोकहिरा न्युज प्रतिमिधी (संपत सावंत)**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, कोल्हापूर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्या वतीने शुटिंग रेंज, विभागीय क्रीडा संकुल, कोल्हापूर येथे पार पडलेल्या शालेय शासकीय विभागीयस्तर शूटिंग स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या गटात विद्या प्रसारक मंडळ, गडहिंग्लज संचलित जागृती हायस्कूल, गडहिंग्लजचा नेमबाजपटू शर्व महेश घुगरे यांने १० मीटर पीप साईट रायफल प्रकारात सुवर्णपदक मिळविले. त्याची नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी, उपाध्यक्ष अरविंद कित्तुरकर, सचिव ॲड. बी.जी. भोसकी, सहसचिव गजेंद्र बंदी व सर्व संचालकांनी अभिनंदन केले. मुख्याध्यापक उमेश सावंत, उपमुख्याध्यापक अनिल मसाळे, पर्यवेक्षक महंतेश दाड्डी यांचे प्रोत्साहन तर क्रीडाशिक्षक संपत सावंत, सचिन मगदुम, प्रकाश हरकारे व महेश घुगरे यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल शर्वचे सर्वत्र कौतुक होत आहे.

Scanned with OKEN Scanner

# साप्ताहिक लोकहिरा न्यूज

संपादक गणपती लक्ष्मण शिंदे 7276756577

Volume-5/Issue: 35/ Date: Friday 16/10/2026 To Thursday 22/10/2026 Pages-No.4 Prize-5 Rs RNI.NO.MAHMAR/2022/85385

## इंदिरा गांधी रुग्णालयाची आरोग्यसेवेत दमदार भरारी; राज्यात मानाचा ठसा!



वाढती रुग्णसंख्या, शस्त्रक्रियांमधील उल्लेखनीय कामगिरी आणि अत्याधुनिक सुविधांमुळे इचलकरंजीच्या शासकीय आरोग्यसेवेला नवी झळाळी.

इचलकरंजी (लोकहिरा न्यूज प्रतिनिधी राजू टिळंगे) : इचलकरंजी येथील इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयाने आरोग्यसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधत राज्य व जिल्हा स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. वाढती रुग्णसंख्या, शस्त्रक्रियांची भरीव कामगिरी, आधुनिक निदान सुविधा आणि डिजिटल आरोग्य सेवांमधील यश यामुळे रुग्णालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. आमदार डॉ. राहुल आवाडे यांच्या पाठपुराव्यामुळे व मार्गदर्शनामुळे रुग्णालयाच्या सेवा-सुविधांच्या विस्ताराला चालना मिळत आहे.रुग्णालयातील मासिक बाह्यरुग्ण संख्या २० हजारांवरून २५ हजारांपर्यंत, तर आंतररुग्ण संख्या १,७५० वरून २,४०० ते २,५०० पर्यंत पोहोचली आहे. दरमहा सरासरी १८८ मोठ्या आणि ६५० हून अधिक लहान शस्त्रक्रिया केल्या जात असून, मोठ्या शस्त्रक्रियांच्या कामगिरीत रुग्णालयाने राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे.

डिजिटल आरोग्य सेवांमध्येही उल्लेखनीय यश मिळवत जानेवारी २०२६ मध्ये आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या टोकन जनरेशनमध्ये राज्यात प्रथम, तर रेकॉर्ड लिंकेजमध्ये तिसरा क्रमांक प्राप्त केला. मार्च २०२६ मध्ये DHIS रँकिंगमध्ये राज्यात चौथा क्रमांक मिळविण्याची कामगिरीही रुग्णालयाने नोंदविली.बालरोग अतिदक्षता सेवा, नवजात बालकांसाठी फोटोथेरपी, मानसोपचार विभागातील 'मैत्री मंच' उपक्रम, प्रौढ अतिदक्षता विभाग, डायलेसिस, प्रयोगशाळा, एक्स-रे, सोनोग्राफी आणि सिटी स्कॅन यांसारख्या सुविधांमुळे रुग्णांना एकाच ठिकाणी विविध उपचार व निदान सेवा मिळत आहेत. दरमहा हजारो तपासण्या आणि गंभीर रुग्णांवरील उपचारांमुळे रुग्णालयाची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण ठरत आहे.ऑक्टोबर २०२५ मध्ये आयोजित संयुक्त शस्त्रक्रिया शिबिरात ३५० हून अधिक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तसेच चोवीस तास आपत्कालीन सेवा उपलब्ध असल्याने नागरिकांना मोठा आधार मिळत आहे.वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, तंत्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांच्या समन्वित प्रयत्नांतून रुग्णालयाची ही प्रगती साध्य होत आहे. सर्वसामान्य नागरिकांना सुलभ, दर्जेदार आणि प्रभावी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयाची वाटचाल निश्चितच अभिमानास्पद आहे.

## कोल्हापुरात एनसीसी कॅडेट्सना 'टीबीमुक्त अभियान'अंतर्गत जनजागृती




व्याख्यानास NCC अधिकारी, असोसिएट एनसीसी अधिकारी (एएनओ), लष्करी कर्मचारी आणि ३८० कॅडेट्स उपस्थित होते.

कोल्हापूर,लोकहिरा न्यूज वृत्तसेवा;-
क्षयरोगाविषयी (टीबी) आरोग्य जनजागृती वाढविण्यासह या आजाराविरोधातील लढ्यात समाजाचा सहभाग बळकट करण्याच्या उद्देशाने कोल्हापूर येथील एनसीसी भवनात १४ ऑक्टोबर २०२६ रोजी एनसीसी कॅडेट्ससाठी 'टीबीमुक्त अभियान'अंतर्गत जनजागृतीपर व्याख्यान व जोश टीम माहिती सत्र आयोजित करण्यात आले.
या व्याख्यानास NCC अधिकारी, असोसिएट एनसीसी अधिकारी (एएनओ), लष्करी कर्मचारी आणि ३८० कॅडेट्स उपस्थित होते.
जिल्हा क्षयरोग केंद्र,सीपीआर रुग्णालय, कोल्हापूर (ग्रामीण) येथील जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हर्षला वेदक आणि जिल्हा क्षयरोग कार्यालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. तेजल जाधव यांनी जिल्हा क्षयरोग विभागाच्या पथकासह हे व्याख्यान घेतले.यावेळी डॉ.वेदक यांनी कॅडेट्सना क्षयरोग, त्याची लक्षणे, प्रसाराचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय तसेच लवकर निदान आणि डॉक्टरांनी सांगितलेला उपचार पूर्ण करण्याचे महत्त्व समजावून सांगितले. क्षयरोगाशी संबंधित गैरसमज आणि कलंक दूर करण्याची गरज अधोरेखित करत कॅडेट्सनी आपल्या कुटुंबीयांमध्ये आणि स्थानिक समुदायात या आजाराबाबत अचूक माहिती पोहोचवावी, असे आवाहन करण्यात आले.
वेळेवर वैद्यकीय सल्ला घेणे, उपचारांचे नियमित पालन करणे आणि 'क्षयरोगमुक्त भारत' हे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सामूहिक जनसहभागाचे महत्त्व या सत्रात स्पष्ट करण्यात आले.
डॉ.जाधव यांनी JOSH टीम बाबत माहिती दिली.त्या म्हणाले की
दिनांक 8.10 . 2026 रोजी राष्ट्रीय स्तरावर JOSH चे अनावरण मा .श्री जगत प्रकाश नड्डा केंद्रीय आरोग्य मंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमा उद्देश हा टीबी मध्ये जनभागीदारी तसेच युवाशक्ती यांच्या सहभाग वाढविणे हा आहे व यांच्या सहकार्याने टीबी मुक्त भारत करण्याचे आहे.जोश टीम अंतर्गत प्रति तालुका ५ एनसीसी स्वयंसेवक व ५ माय भारत स्वयंसेवक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या टीममध्ये प्रत्येक तालुका स्तरावर एक नोडल ऑफिसर ची नियुक्ती केली आहे. या टीम मार्फत क्षयरोग जनजागृती, रुग्णांना मदत, विविध प्रसिद्धी उपक्रम राबवून याची माहिती व फोटो टीबी मुक्त भारत ऍप मध्ये अपलोड केले जात आहेत.तरुण कॅडेट्सना आरोग्य जनजागृतीचे दूत बनवून 'टीबीमुक्त अभियानात'अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी प्रेरित करणे, ही एनसीसी ग्रुप मुख्यालय, कोल्हापूरची सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रनिर्मितीची वचनबद्धता दर्शविणारी उपक्रमाची वैशिष्ट्ये ठरली आहे




## मुंबई येथील लोकहिरा न्यूज वृत्तसेवा ;- अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिवाळीपूर्वीच भाऊबीज-महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे



राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिवाळीपूर्वीच शासनाकडून भाऊबीज भेट म्हणून प्रत्येकी दोन हजार रुपये देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.राज्यात अंगणवाडी सेविका 1,08,627 आणि मदतनीस 1,05,470 आहेत. अशी एकूण २,१४,०९७ पदे कार्यरत आहेत. या सर्व कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रत्येकी दोन हजार रुपये भाऊबीज भेट देण्यात येणार आहे. यासाठी ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील गर्भवती महिला, स्तनदा माता आणि बालकांच्या पोषणाची काळजी घेणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची दिवाळी गोड व्हावी, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner